17 SEP 2022
पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# राष्ट्र समर्थपणे उभे राहण्यामध्ये जनजाती समाजाचे योगदान

## वंदना केंगले-साबळे



कोल्हापूर : 'स्वातंत्र्य चळवळीमध्ये अनुसूचित जमातीच्या स्वातंत्र्यसैनिकांनी दिलेले योगदान' या विषयावर बोलताना वंदना केंगले-साबळे.

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

राष्ट्र सशक्त आणि समर्थपणे उभे राहण्यामध्ये जनजाती समाजाचे मोठे योगदान आहे. या समाजातील अनेक शूरवीर महापुरुषांनी देशासाठी प्राणांची आहुती दिलेली आहे. जनजाती समाज स्वातंत्र्य युद्धामध्ये सर्व शक्तिनिशी लढला होता, असे प्रतिपादन पुणे येथील सामाजिक कार्यकर्त्या वंदना केंगले-साबळे यांनी केले.

राष्ट्रीय अनुसूचित जनजाती आयोग, भारत सरकार आणि शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने 'आझादी का अमृतमहोत्सव' कार्यक्रमाअंतर्गत 'स्वातंत्र्य चळवळीमध्ये अनुसूचित जमातीच्या स्वातंत्र्यसैनिकांनी दिलेले योगदान' या विषयावर विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहामध्ये आयोजित कार्यशाळेमध्ये बोलत होत्या. वंदना केंगले-साबळे म्हणाल्या, अनादी काळापासून जनजातीचा समाज हा डोंगराळ भागात, दऱ्याखोऱ्यांमध्ये आणि घनदाट जंगलांमध्ये वास्तव्य करत आलेला आहे. आजही त्यांची म्हणावी तितकी प्रगती झालेली नाही. राष्ट्रीय संयोजक दिलीप पवार, शामलाल कॉलेज, दिल्ली विद्यापीठ येथील प्रा. विवेकानंद नर्तम यांनी मनोगत व्यक्त केले. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के अध्यक्षीय भाषणात म्हणाले, ज्या भागामध्ये अनुसूचित जनजातीचे विद्यार्थी आहेत, त्या भागांमध्ये पोहोचून त्यांना अभ्यासक्रमांमध्ये प्रवेश घेण्यास उद्युक्त केले पाहिजे.

सीमाभागातील विद्यार्थ्यांना विशेष सवलत दिलेली आहे. शंभरहून अधिक विद्यार्थ्यांनी विविध कोर्सच्या अभ्यासक्रमांमध्ये भाग घेतलेला आहे. सुश्मिता खुटाळे यांनी सूत्रसंचालन केले, तर प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी आभार मानले.

17 SEP 2022 लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# देशासाठी जनजाती समाजाचे योगदान

## वंदना केंगले-साबळे : शिवाजी विद्यापीठातील कार्यशाळा

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : राष्ट्र सशक्त आणि समर्थपणे उभे राहण्यामध्ये जनजाती समाजाचे मोठे योगदान आहे. या समाजातील अनेक शूरवीर महापुरुषांनी देशासाठी प्राणांची आहुती दिली आहे. जनजाती समाज स्वातंत्र्य युद्धामध्ये सर्व शक्तीनिशी लढला होता, असे प्रतिपादन पुणे येथील सामाजिक कार्यकर्त्या वंदना केंगले-साबळे यांनी येथे गुरुवारी केले.

राष्ट्रीय अनुसूचित जनजाती आयोग आणि शिवाजी विद्यापीठातर्फे आयोजित 'स्वातंत्र्य चळवळीमध्ये अनुसूचित जमातीच्या स्वातंत्र्यसैनिकांनी दिलेले योगदान' या विषयावरील कार्यशाळेत ते बोलत होते. विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहातील या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के होते.

अनादी काळापासून जनजातीचा समाज हा डोंगराळ भागात, दऱ्या-खोऱ्यांमध्ये आणि घनदाट जंगलांमध्ये वास्तव्य करीत आला आहे. या समाजाचे आपल्या देशावर अतिव प्रेम आहे आणि देशाशी एकनिष्ठ आहे, असे वंदना केंगले-साबळे यांनी सांगितले. राष्ट्रीय संयोजक दिलीप पवार राष्ट्रीय अनुसूचित जनजाती आयोगाची ओळख करून दिली. दिल्लीतील शामलाल कॉलेजचे प्रा. विवेकानंद नर्तम यांनी स्वातंत्र्य चळवळीमध्ये अनुसूचित जमातीच्या स्वातंत्र्यसैनिकांनी दिलेले योगदान समजून घेणे आवश्यक असल्याचे सांगितले.

यावेळी डॉ. श्रीकृष्ण महाजन, प्रमोद पांडव, विलास सोयम, अवनिश पाटील, अविनाश भाले, एस. पी. हंगिरगेकर उपस्थित होते. प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनी प्रास्ताविक केले. सुश्मिता खुटाळे यांनी सूत्रसंचालन केले. प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी आभार मानले.

लोकमत

# 'विज्ञानातील नोबेल शलाका'चे सोमवारी प्रकाशन

कोल्हापूर : अनुबंध प्रकाशन, पुणे प्रकाशित व कोल्हापूरच्या लेखिका डॉ. तेजस्विनी देसाईलिखित 'विज्ञानातील नोबेल शलाका' या पुस्तकाचे प्रकाशन सोमवारी (दि. १९) सायंकाळी सव्वा पाच वाजता शाहू स्मारक भवनात होत आहे. विज्ञान साहित्यात भर घालणाऱ्या या पुस्तकाचे प्रकाशन ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. दत्तप्रसाद दाभोळकर यांच्या हस्ते व शिवाजी विद्यापीठाचे प्र. कुलगुरु प्रा. डॉ. पी. एस. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली होत आहे. आमदार प्रकाश आबीटकर प्रमुख उपस्थित राहणार आहेत. प्रकाशन सोहळ्यास उपस्थित रहावे, असे आवाहन देसाई व अनिल कुलकर्णी यांनी केले आहे.

17 SEP 2022
तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# मटेरियल सायन्सचा अभ्यास अत्यावश्यक

## प्रशांत हडकर यांचे प्रतिपादन : शिवाजी विद्यापीठ तंत्रज्ञान विभागात अभियंता दिन उत्साहात



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीतील तंत्रज्ञान विभागात अभियंता प्रशांत हडकर व डॉ. पी. डी. पाटील आदी मान्यवरांच्या हस्ते सर मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांच्या प्रतिमेचे पूजन झाले**

कोल्हापूर
प्रतिनिधी

सध्याच्या काळात इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंटचा वेग प्रचंड असून नवीन बांधकाम मटेरियल्स वापरणे अत्यंत गरजेचे आहे. त्यासाठी मटेरियल सायन्स चा अभ्यास अत्यावश्यक आहे, असे इंजिनिअर प्रशांत हडकर यांनी सांगितले. शिवाजी विद्यापीठात तंत्रज्ञान विभागात अभियंता दिना निमित आयोजित व्याख्यानात ते बोलत होते.

प्रभारी संचालक डॉ. पी. डी. पाटील यांच्या हस्ते सर मोक्षगंडम विश्वेश्वरय्या यांच्या प्रतिमेचे पूजन झाले. प्रशांत हडकर यांनी बी.टेक. सिव्हिल इंजिनिअरिंगच्या विद्यार्थ्यांना इनोव्हेटिव्ह मटेरियल्स अँड कन्स्ट्रक्शन टेक्नॉलॉजी या विषयावर मार्गदर्शन केले. या व्याख्यानानंतर बी.टेक. स्थापत्य अभियांत्रिकीमध्ये पोस्टर प्रेझेंटेशन स्पर्धा झाली.

प्रशांत हडकर हे गेली २६ वर्षे स्ट्रक्चरल इंजिनिअर म्हणून सिव्हिल इंजीनियरिंग क्षेत्रात कार्यरत असून त्यांनी ३००० पेक्षा अधिक सिव्हील प्रोजेक्ट्स पूर्ण केलेले आहेत. यावेळी ते म्हणाले, कार्बन डाय-ऑक्साइड ची निर्मिती कमी करणे हे सध्याच्या कन्स्ट्रक्शन इंडस्ट्रीसमोरील प्रमुख आव्हान आहे. त्यासाठी कॉंक्रीट व स्टीलला पर्याय देणे गरजेचे आहे.

प्रास्ताविक प्रा. डॉ. पी. पी. फडणीस, सिव्हिल इंजिनिअरिंग विभागाचे समन्वयक इंजिनिअर महेश साळुंखे यांनी आभार मानले. यावेळी या कार्यक्रमासाठी सह. प्रा. व्ही. के. कांबळे, वाय्. एस्. व्हटकर, ए. आर. रेणाविकर उपस्थित होते. कार्यक्रमास अधिविभागाचे संचालक डॉ. एस. एन. सपली, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, प्र-कुलगुरु डॉ. पी. एस. पाटील व कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांचे प्रोत्साहन लाभले.

तरुण भारत

# युनायटेड किंगडम विद्यापीठात विद्यार्थिनींची पीएच. डी.साठी निवड

कोल्हापूर :शिवाजी विद्यापीठाच्या स्कूल ऑफ नॅनोसायन्स अँड





टेक्नॉलॉजी या अधिविभागातील तीन विद्यार्थिनींची युनायटेड किंगडम आणि दक्षिण कोरियातील विद्यापीठांमध्ये उच्च विद्यावेतनासह मास्टर्स आणि पीएच.डी. साठी निवड झाली आहे. युनायटेड किंगडम मधील युनिव्हर्सिटी ऑफ शेफफिल्ड (जागतिक क्रमवारी ९६) येथे वैष्णवी सावेकर (रा. राधानगरी, कोल्हापूर) यांची सेमीकंडक्टर फोटोनिक्स आणि इलेक्ट्रॉनिक्स या विषयामध्ये मास्टर्स (पदवीत्तर) अभ्यासक्रमासाठी निवड झाली आहे. दक्षिण कोरिया मधील चुंग-आंग विद्यापीठ (जागतिक क्रमवारी ३९२) येथे मधुरा देशपांडे (रा. पुणे) यांची पीएच.डी. साठी तर रोहिणी शिंदे (रा. इस्लामपूर, सांगली) यांची एम.एस्सी.-पीएच.डी. एकात्मिक अभ्यासक्रमासाठी निवड झाली आहे. वैष्णवी आणि रोहिणी यांनी बी.एस्सी. नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी हा अभ्यासक्रम २०२०-२१ मध्ये तर मधुरा यांनी बी.एस्सी.- एम.एस्सी. नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी (५ वर्षांचा एकात्मिक) अभ्यासक्रम २०१८-१९ मध्ये पूर्ण केला आहे. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, नॅनोसायन्स अँड टेक्नॉलॉजी अधिविभागाचे प्रभारी संचालक डॉ. किरणकुमार शर्मा, सर्व शिक्षकांनी विद्यार्थिनींचे अभिनंदन केले.

तरूण भारत

# जैन सेवासंघातर्फे महावीर अध्यासनाला भरीव देणगी

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या भगवान महावीर अध्यासन केंद्रामार्फत १३ कोटी रूपयांची भव्य वास्तू उभारली जाणार आहे. यातून जैनधर्माचे शास्त्रीय संशोधन व युवकांना मार्गदर्शन यासाठी आंतरराष्ट्रीय स्तरापर्यंत कार्य केले जाईल. सुरेश मगदूम, डॉ. महावीर मिठारी, अतूल पाटणे, संदिप अथणे, अजय कोले, भारत वणकुद्रे यांनी जैनसेवा संघामार्फत भगवान महावीर अध्यासनास १ लाख ११ हजार एकशे ११ रूपये बृहत देणगी दिली. जैनसेवा संघ, कोल्हापूर गेली २० वर्षे साततत्याने युवकांमध्ये विविध प्रकल्पातून धर्मभावना व सामाजिक बांधीलकी जोपासत आहे. त्यांच्या या कार्याचे भगवान महावीर अध्यासनाने अभिनंदन केले आहे. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, भगवान महावीर अध्यासनाच्या निधी संकलन समितीचे अध्यक्ष डॉ. जे. एफ. पाटील यांनी आभार मानले. भगवान महावीर अध्यासनाच्या इमारतीची देणगी आयकर सवलत पात्र असून सर्व व्यक्ती व संस्थांनी या कार्यास देणगी द्यावी, असे आवाहन भगवान महावीर अध्यासनाचे समन्वयक डॉ. विजय ककडे यांनी केले आहे.

तरुण भारत

# 'विज्ञानातील नोबेल शलाका'चे सोमवारी शाहू स्मारकमध्ये प्रकाशन

कोल्हापूर : 'विज्ञानातील नोबेल शलाका' या डॉ. तेजस्विनी देसाई यांनी लिहिलेल्या पुस्तकाचे प्रकाशन सोमवारी १९ रोजी करण्यात येणार आहे. विज्ञान साहित्यामध्ये भर घालणाऱ्या या मराठी पुस्तकाचा प्रकाशन सोहळा शाहू स्मारक भवनमध्ये ज्येष्ठ शास्त्रज्ञ, लेखक डॉ. दत्तप्रसाद दाभोळकर यांच्या हस्ते होणार आहे. अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे प्र कुलगुरू प्रा. डॉ. पी. एस. पाटील भूषवणार असून, आमदार प्रकाश आबिटकर यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

तरूण भारत

# 'निकाल चुकलेल्या विद्यार्थ्यांची माहिती पाठवावी'

**कोल्हापूर :** विद्यापीठ अंतर्गत उन्हाळी ५६१ परीक्षांपैकी ४४६ परीक्षांचे निकाल जाहीर झाले आहेत. काही विद्यार्थ्यांनी ओएमआरवर पीआरएन नंबर, बैठक क्रमांक, विषय सांकेतांक, आदी माहिती चुकीच्या भरल्याने निकाल उपस्थित नसल्याचा अहवाल आला आहे. अशा विद्यार्थ्यांची माहिती संकलित करण्याचे काम परीक्षा विभागाच्या वतीने सुरू आहे. अधिविभाग आणि महाविद्यालयांनी विद्यापीठाच्या लिंकवर परीक्षा अप्रूव्ह करण्यासाठी लॉगीन आयडी पासवर्डचा वापर करून माहिती सादर करावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. जाधव यांनी केले आहे.

तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठाच्या १८ परीक्षांचे निकाल जाहीर

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील उन्हाळी सत्रातील १८ परीक्षांचे निकाल शुक्रवारी घोषीत झाले. तसेच ७२७ अभ्यासक्रमातील परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांना ओएमआर प्रणालीच्या उत्तरपत्रिका दिल्या होत्या. यामध्ये परीक्षार्थींनी आरएनएन, सीट नंबर आणि विषय संकेतांक चुकीचा लिहिल्याने त्यांच्या निकालपत्रात अनुपस्थित नोंद झाली आहे. त्यांच्यासाठी महाविद्यालयीन स्तरावरून माहिती संकलित केली जात असल्याची माहिती विद्यापीठ प्रशासनाने दिली. बी.एस्सी. फुड सायन्स सेमिस्टर १ व २, बी.सी.ए. सेमिस्टर ३ व ४, एम.आर.एस. सेमिस्टर ३ व ४, एम.एस. डब्ल्यू. सेमिस्टर १ व २, बी.आय.डी. सेमिस्टर ३ व ४, बी. व्होकेशनल सेमिस्टर ३ व ४ व बी. व्होकेशनल ॲग्री सेमिस्टर १ व २ अशा १८ परीक्षांचे निकाल घोषीत झाले. घोषीत झालेल्या निकालात सीट, आरएनएन नंबर चुकलेल्या विद्यार्थ्यांची माहिती महाविद्यालयीन स्तरावर मागवली असल्याचे डॉ. जाधव यांनी स्पष्ट केले.

